नि.दि.दा.क्र.८७/२०१७
नि.क्र.६७

<u>वादी सा.क्र.३</u>

<u>प्रतिवादी करिता उलट तपास विधीज्ञ श्री.आर.ए.सुरवसे यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>

६. माझे घर मुगावच्या गावठाणाच्या बाजूला शेतात आहे. माझ्या घराच्या पूर्वेस गोविंद जगताप यांचे घर आहे. वाद मिळकतीच्या पूर्व कोप-यात घर नाही, साक्षीदार स्वत: सांगतात रस्ता आहे. दावा मिळकतीचा सन-१९९७ चा ८-अ उतारा मी पाहिलेला आहे. दावा मिळकतीस वादीची नोंद वारसा हक्काद्वारे झालेली आहे. सन-१९९७-१९९८ साली मुगाव ग्रामपंचायतचे सरपंच श्री.गुरूनाथ जगताप हे होते. सन-१९९७-१९९८ ला मुगावचे ग्रामसेवक कोण होते हे मला आठवत नाही.

७. दावा मिळकतीची मोजणी कोणत्या वर्षी झाली हे मला आठवत नाही. दावा मिळकतीची मोजणी कोणी केली हे मला माहित नाही.

**प्रश्न**- दावा मिळकतीची मोजणी होताना लगत भुखंड धारक हजर होते काय ?

**उत्तर**- मी स्वत:च हजर नव्हतो.

८. दावा मिळकतीची मोजणी होताना मी हजर नसल्यामुळे दावा मिळकतीचे टिपण व पंचनामा यावर माझ्या सहया नाहीत हे म्हणणे खरे आहे.

**प्रश्न**- तुम्ही दावा मिळकत मोजणी होताना हजर नसल्यामुळे दावा मिळकतीचा ताबा कोणी कोणाला दिला हे तुम्हाला माहित नाही ?

**उत्तर**- दावा मिळकतीचा कब्जा सरपंचाने दिला.

९. सरपंचाने ताबा पावती दिल्याचे मला माहित नाही. वादी यांचे वडिल कोणत्या साली मयत झाले हे मला माहित नाही. वादी यांचे वडिल त्यांच्या हयातीत वादी यांनी सद्या जेथे पक्के घर बांधले आहेत तेथेच राहत होते हे म्हणणे खरे आहे. वादी जेथे राहतात त्या घराच्या पूर्वेस - भाऊराव शिंदे, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस-रस्ता व उत्तरेस - ज्योतीराम शिंदेचे घर आहे. वादी दिलीप नोकरी करीत होते हे म्हणणे खरे आहे. ते सन-२०१२-२०१३ साली सेवानिवृत्त झाले. वादी दिलीप नोकरीच्या कालावधीत, नोकरीच्या गावी राहत होते हे म्हणणे खरे आहे. दावा मिळकत गावठाणात स्थित आहे. गावठाणा लगत गायरान आहे हे म्हणणे खरे आहे. त्या

गायरानात सद्या अनेक लोकांची घरे आहेत, हे म्हणणे खरे आहे. दावा मिळकत गावठाणात आहे किंवा बाजूला आहे हे तेथे अनेक घरे झाल्यामुळे सांगता येत नाही हे म्हणणे खरे नाही, साक्षीदार स्वत: सांगतात की, दावा मिळकत गावठाणात आहे. दावा मिळकत गावठाणात आहे यासाठी मी ८-अ उतारा पाहिलेला आहे. शिवाजी रामकिशन शिंदे यांच्या घराच्या उत्तरेस दावा मिळकत आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस शेजारी रस्ता आहे. दावा मिळकतीच्या दक्षिणेस- वसंत रामकिशन शिंदे यांची जागा आहे. माझ्या सरतपासातील मजकूर माझ्या वकिलांच्या सांगण्याप्रमाणे टंकलिखीत केला हे म्हणणे खरे नाही, साक्षीदार स्वत: सांगतात तो मी सांगितला आहे. दावा मिळकतीवर वाळू, दगड, माती व विटा हे टाकत असताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे. ते वाळू, दगड, माती व विटा हे कोणत्या ठिकाणाहून घेतले हे मला माहित नाही. वादी माझे सख्खे चुलत भाऊ आहेत हे म्हणणे खरे आहे. मी वादी यांच्या नात्यातील असल्यामुळे खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.06.21 15:00:34 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २०/०६/२०२५.